जा. क्र.मृसमृचा/निवगुनि/मृआपमासू/**२३६**/२०१९
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११००५ **दिनांक - ६ मे, २०१९**

**प्रति,**

**१. विभागीय कृषि सहसंचालक,(सर्व) ...............**

**२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)..........**

**विषय : राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत मृद आरोग्य पत्रिका योजना सन २०१९-२० मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ :१. केंद्र शासनाचे पत्र क्र. २-२/२०१८ फर्ट युज दि. ३० एप्रिल, २०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता.**
**२. केंद्र शासनाचे पत्र क्र. २-२/२०१८ फर्ट युज दि. ३० एप्रिल, २०१९.**

जमिनीचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी मृद तपासणीवर आधारित खतांच्या संतुलित तसेच कार्यक्षम वापरास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. या सर्व बाबींचा विचार करुन, केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने राज्यात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियांनातर्गत **"मृद आरोग्य पत्रिका" ही योजना सन २०१५-१६ पासून** राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत प्रत्येक शेतक-याला दोन वर्षातून एकदा त्याच्या शेतजमिनीची मृद आरोग्य पत्रिका उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने या योजनेची पहिली व दुसरी सायकल जवळपास पूर्ण झालेली आहे.

आता या योजनेचे तीसरे चक्र **(3rd Cycle)** सन २०१९-२० मध्ये राबविण्यासाठी केंद्र शासनाची प्रशासकीय मान्यता वरील संदर्भ क्र. १ नुसार प्राप्त झालेली आहे. तसेच केंद्र शासनाच्या उपरोक्त क्र. २ च्या पत्रानुसार सन २०१९-२० मध्ये सीमीत क्षेत्रात पथदर्शी प्रकल्प पध्दतीने अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. यामध्ये जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एक गाव निवडुन त्यातील सर्व खातेदारांचे मृद नमुने काढुन त्यंना जमिन आरोग्य पत्रिका वितरीत करावयाचे आहे. तसेच सदर गावात जमिन आरोग्य पत्रिकेतील शिफारशीनुसार सुक्ष्म मुलद्रव्यांचे खत व्यवस्थापनासाठी मापदंडानुसार देय अनुदानावर खतांचा येत्या हंगामात वापर करावयाचा आहे. तदअनुषंगाने **मृद आरोग्य पत्रिका योजनेच्या सन २०१९-२० च्या सविस्तर मार्गदर्शक सूचना** सोबत सहपत्रित करण्यात येत आहे.

**सोबत – मार्गदर्शक सुचना**

स्वाक्षरीत/-
**कृषि संचालक**
**(निविष्ठा व गुणनियंत्रण)**
**कृषि आयुक्तालय,म.रा. पुणे-१**

**प्रत माहिती व योग्य त्या तात्काळ कार्यवाहीस्तव रवाना.**

१. कृषि उपसंचालक (माहिती विभाग) कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-५
२. जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी (सर्व)

**प्रत माहितीस्तव समादराने अग्रेषित**

१. कृषि संचालक (सर्व) कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५
२. विभागप्रमुख, मृदाशास्त्र व कृषि रसायनशास्त्र विभाग, कृषि विदयापीठ (सर्व)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

मा. सचिव, कृषि, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय मुंबई-३२
मा. आयुक्त, कृषि, महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे-१
प्रत- कक्ष अधिकारी, १-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांना माहितीस्तव

# <u>मृद आरोग्य पत्रिका योजना सन २०१९-२०</u>
# मार्गदर्शक सूचना

## १. <u>प्रस्तावना :</u>

माती हे वनस्पतींच्या वाढीसाठी अन्नद्रव्यांचा पुरवठा करणारे सजीव व नैसर्गिक माध्यम आहे. खनिज, सेंद्रिय घटक, पाणी आणि हवा हे जमिनीचे प्रमुख घटक असून पीक वाढीसाठी या घटकांचे प्रमाण एकत्र असते. जमिनीचा अभ्यास आणि वर्गीकरण त्याच्या उपयोगीतेनुसार केला जातो. नैसर्गिक साधन सामुग्रीचे व्यवस्थापनाकरिता मृद सर्वेक्षण करण्यात येते आणि मृद परिक्षण हा खतांचा संतुलीत वापर आणि व्यवस्थापन याचा एक भाग आहे.

पिकांच्या वाढीसाठी जमिनीकडुन अन्नांश घेतले जातात. त्या बदल्यात नवीन अन्नांशांचा जमिनीस पुरवठा करणे गरजेचे असते. त्यातुनच एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाची संकल्पना तयार झाली आहे. जमिनीचे आरोग्य टिकविणे, पर्यायाने जमिनीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक गुणधर्म टिकविणे अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी शेतजमिनीची मृदा तपासणी करणे आवश्यक आहे.

प्रत्येक क्षेत्राचे माती परीक्षण करुन घेणे व त्या आधारे जमिनीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण जाणुन घेणे, त्यानुसार पुढील हंगामात घेतल्या जाणा-या पिकांसाठी खतमात्रांची शिफारस करणे, पिकांच्या पेरणीच्या वेळी बाजारामध्ये उपलब्ध असलेल्या खत प्रकारानुसार खतांचे प्रमाण निश्चित करुन वापर करणे या बाबींचा अवलंब केल्यास खतांच्या समतोल वापरास चालना मिळेल. या सर्व बाबींचा विचार करुन, केंद्र व राज्य शासनाच्या सहयोगाने राज्यात राष्ट्रीय शाश्वत शेती अभियांनातर्गत 'मृद आरोग्य पत्रिका' ही योजना सन २०१५-१६ पासून राबविण्यात येत आहे.

या योजनेची सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये पहिली सायकल राबविण्यात आलेली असुन, सन २०१७-१८ व २०१८-१९ या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये दुसरी सायकल राबविण्याची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. प्रथम सायकलमध्ये २७.२२ लाख नमुन्यांची तपासणी करून १३१.४५ लाख जमीन आरोग्य पत्रिका वितरीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच दुस-या सायकलमध्ये एप्रिल २०१९ अखेर २७.५१ लाख नमुन्यांची तपासणी करून ११८.४८ लाख शेतक-यांना जमिन आरोग्य पत्रिका वितरीत करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमासाठी केंद्र शासनाने विकसीत केलेल्या सॉईल हेल्थ या संगणक प्रणालीवर याबाबतची विहित माहिती अपलोड करण्यात आलेली आहे. या माहितीचा उपयोग संबंधित शेतक-यांना त्यांच्या जमिनीची आरोग्य पत्रिका डिजीटल स्वरूपात मोबाईल लिंकद्वारे उपलब्ध करून देणे, शेतक-यांना हंगामादरम्यान त्यांच्या जमिन आरोग्य पत्रिकेमधील रासायनिक व सेंद्रिय खतांच्या पिकनिहाय शिफारशीचे मोबाईल संदेश देणे, कृषि कल्याण अभियानांतर्गत सहभागी झालेल्या गावांचे मुलद्रव्यांच्या स्थितीबाबतचे डिजीटल नकाशे तयार करणे, राज्याच्या महत्वकांक्षी महाॲग्रीटेक या प्रकल्पांतर्गत विविध बाबींच्या बरोबर या योजनेच्या पोर्टलवरील माहितीच्या आधारे तालुकानिहाय व गावनिहाय डाटाबेस तयार करणे इ. नाविन्यपुर्ण तंत्रज्ञानासाठी करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

## २. <u>योजनेचे उद्देश :</u>

जमिन आरोग्य पत्रिकेच्या माध्यमातुन शेतक-यांना त्याच्या शेतजमिनीची रासायनिक गुणधर्म स्थिती, प्रमुख अन्नद्रव्यांची पातळी व सुक्ष्म मुलद्रव्य कमतरता स्थिती व त्यानुसार पिकांना द्यावयाच्या खत मात्रेची माहिती देण्यात येणार आहे. सदर योजनेच्या अंमलबजावणी करीता केंद्र शासनाचा ६० टक्के व राज्य शासनाचा ४० टक्के आर्थिक सहभाग राहणार आहे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सन २०१९-२० मध्ये योजनेत बदल करून राज्यातील प्रत्येक तालुक्यातून एक गाव निवडून त्या गावातील वहितीखालील संपूर्ण शेतजमीनीतील माती नमुन्यांची तपासणी करून गावातील सर्व शेतक-यांना मृद आरोग्य पत्रिका वितरणाचा **पथदर्शी प्रकल्प** राबविण्याचा मुख्य उद्येश आहे. या उद्देशामध्ये खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

अ) रासायनिक खतांचा अनिर्बंध वापर कमी करुन मृदा तपासणीवर आधारित, अन्नद्रव्यांच्या कमतरतेनुसार खतांच्या संतुलित व कार्यक्षम वापरास प्रोत्साहन देणे.

ब) मृदा आरोग्य सुधारण्यासाठी तसेच अन्नद्रव्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी जैविक खते, सेंद्रीय खते, गांडूळ खत, निंबोळी/सल्फर आच्छादित युरियासारख्या संथ गतीने नत्र पुरवठा करणा-या खतांच्या वापरास प्रोत्साहन देणे.

क) एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाद्वारे पिकांच्या उत्पादकतेत वाढ करणे.

ड) क्षमता वृध्दी, कृषि शाखेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग /भारतीय कृषि संशोधन अनुसंधान (ICAR) व राज्यातील कृषि विद्यापिठांशी सुसंगत सहभागाने मृद तपासणी प्रयोगशाळांच्या कार्यपध्दतीत सुधारणा करणे.

इ) जमीनीच्या उत्पादकतेविषयी समस्या जाणून घेण्यासाठी राज्यांमध्ये मृद नमुने काढणे व तपासणीच्या पध्दतीमध्ये समानता आणणे व निर्धारित जिल्ह्यांमध्ये तालुका / परिमंडळ स्तरीय खतांच्या शिफारशी विकसीत करणे.

**३. योजनेतील घटक:**

१) **जमिन आरोग्य पत्रिकेचे वितरण :** जिल्हयातील सर्व तालुक्यातून निवडलेल्या एका गावातील सर्व खातेदारांना त्यांच्या वहितीखालील जमिनींची मृद आरोग्य पत्रिका वितरण करणे.

२) **सुक्ष्म मुलद्रव्ये व भुसुधारक वापराच्या प्रात्यक्षिकांना अर्थसहाय्य : जमिन आरोग्य पत्रिकेतील शिफारशीनुसार निवडलेल्या गावातील वहितीखालील सर्व क्षेत्रासाठी** सुक्ष्म मुलद्रव्ये व भुसुधारक वापराच्या प्रात्यक्षिकांना प्रति हेक्टर रु.२५००/- या मापदंडानुसार अर्थसहाय्य करणे.

३) **अभियान व्यवस्थापन :** या घटकांतर्गत प्रकल्प व्यवस्थापनाकरीता कृषि आयुक्तालयस्तरावर राज्य समन्वयक, संगणक प्रोग्रॅमर, तांत्रिक सहाय्यक, शिपाई इ. कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे, कार्यालयीन खर्च, आढावा सभांचे आयोजन, क्षेत्रीय दौरे इ. बाबींचा समावेश राहील.

**४. जिल्हास्तरीय कार्यकारी समिती :-**

योजनेचे नियोजन व अंमलबजावणी जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने करावयाचे असून त्यासाठी पुढीलप्रमाणे जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) | जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य |
| ३) | कृषि विद्यापीठ/ कृषि विज्ञान केंद्र प्रतिनिधी | - | सदस्य |
| ४) | उपविभागीय कृषि अधिकारी | - | सदस्य |
| ५) | जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी | - | सदस्य |
| ६) | कृषि उपसंचालक (जिअकृअ कार्यालय) | - | सदस्य सचिव |
| ७) | जिल्हा परिषद कृषि समितीचे सभापती | - | सदस्य |
| ८) | पंचायत राज संस्थेचे दोन प्रतिनिधी | - | निमंत्रित सदस्य |

योजनेच्या उद्देशानुसार समितीने जिल्हयाचा वार्षिक कृति आराखडा तयार करणे यामध्ये मृद नमुने काढण्यापासुन ते शेतक-यांना मृद आरोग्य पत्रिका वितरण करण्यापर्यंत कामाचे कालबध्द नियोजन करणे. इत्यादी बाबींची प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रण या सर्व जबाबदा-या जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने नियमितपणे पार पाडावयाच्या आहेत. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयातील कृषि उपसंचालक हे या योजनेंचे जिल्हास्तरीय नोडल (समन्वय) अधिकारी म्हणून काम पाहतील**. तसेच उपविभागीय कृषि अधिकारी यांचेवर योजनेच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी राहिल. योजनेचे नोडल अधिकारी तथा कृषि उपसंचालक जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय यांनी वेळोवेळी या योजनेत सहभागी असणा-या सर्व मृद चाचणी प्रयोगशाळांची तांत्रिक तपासणी जिल्हा मृद चाचणी अधिकारी यांचे सहाय्याने करावयाची आहे. यामध्ये आवश्यक उपकरणे, रसायने काच सामान, तांत्रिक मनुष्यबळ

प्रयोगशाळेतील इतर सुविधा इत्यादी बाबींची कटाक्षाने तांत्रिक तपासणी (आवश्यकता व प्रत्यक्षात वापर) करावी जेणेकरुन शेतक-यांना देण्यात येणा-या मृद आरोग्य पत्रिकेच्या गुणवत्तेवर परिणाम होणार नाही. तसेच समन्वय अधिकारी यांनी सर्व सहभागी मृद चाचणी प्रयोगशाळेशी समन्वय साधुन दर साप्ताहास विहित नमुन्यातील (सोबत प्रपत्र अ व ब) योजनेचा अचुक प्रगती अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर करण्याची जबाबदारी राहील.

**जिल्हास्तरीय कार्यकारी समितीची कामे खालीलप्रमाणे राहतील.:**

१) मृद नमूने काढण्यासाठी गावांची निवड करणे. काढलेल्या मृद नमुन्यांचे निर्धारीत केलेल्या कालावधीत विश्लेषणाचे काम करून घेणे.

२) मृद नमुन्यांचे सविस्तर विश्लेषण करुन मातीतील पोषक अन्नद्रव्य स्थितीबाबत भाष्य करणे.

३) जमिन आरोग्यपत्रिका तयार करुन वेळेत शेतक-यांना वितरीत करणे.

४) प्रमुख पिकांसाठी अन्नद्रव्य व्यवस्थापन पध्दती विकसीत करणे.

५) अन्नद्रव्याची कमतरता आणि समस्याग्रस्त जमिनींसाठी भूसुधारकाची मागणी नोंदविणे.

६) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहभागधारकांची क्षमता वृध्दी करणे.

७) गावपातळीवर शेतक-यांच्या बैठका आयोजित करुन अन्नद्रव्यांची कमतरता असणा-या विशिष्ठ क्षेत्रामध्ये खत मात्रांच्या शिफारसीचा प्रसार व प्रचार करणे.

८) मृद आरोग्य पत्रिकेच्या अहवालानुसार विविध योजनांतर्गत पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करुन खत मात्रांचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे.

९) सुधारीत व सुपिक जमिनीमध्ये उच्चतम मुल्य असणारी पिके प्रस्तावित करणे.

## ५. योजनेत पंचायत राज संस्थेचा सहभाग व भुमिका :

**१)** या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्य शासनाबरोबरच पंचायत राज / ग्रामपंचायत संस्थेचा देखिल सक्रिय सहभाग घेण्यात यावा.

**२)** प्रात्यक्षिके, शेतकरी प्रशिक्षण व तंत्रज्ञानाचा व्यापक प्रसार परिसरातील संपर्क त्या दृष्टीने कार्यवाही करणे ,सदर भागात योजना लोकाभिमूख करण्याकरिता संबंधित शेतकरी व ग्रामपंचायतीचा उत्तम सहभाग होऊ शकेल.

**३)** योजनेत निवडलेल्या गावातील मृद नमुने काढण्यापासुन ते मृद आरोग्य पत्रिकेचे वितरण या संपुर्ण प्रक्रियेत गावातील शेतक-यांचा सक्तीचा सहभाग असावा.

## ६. योजनेची कार्यपध्दती सन २०१९-२० :

**अ)** प्रत्येक जिल्ह्याने, जिल्ह्यातील समाविष्ठ प्रत्येक तालुक्यातुन एका गावाची निवड करून त्यातील सर्व शेतकरी **खातेदारांचे नावावरील सर्व वहितीखालील शेत जमिनीतून** मृदा नमुने काढुन त्याची मृद तपासणी प्रयोगशाळेत तपासणी करून जमिन आरोग्य पत्रिका संबंधित सर्व शेतक-यांना वितरीत करावयाच्या आहेत.

**गावाची निवड :-** प्रत्येक तालुक्यातुन एका गावाची निवड करताना खालील बाबी कृपया लक्षात घ्याव्यात.

अ) तालुक्यातील एकुण शेतकरी खातेदारांची संख्या भागीले एकुण गावांची संख्या या परिगणनेनुसार सरासरी एवढी किंवा किंचीत जास्त खातेदार संख्या असलेले गाव निवडावे. तथापी, सरासरीपेक्षा कमी खातेदार संख्या असलेले गाव शक्यतो निवडु नये.

ब) सदर गावामध्ये योजनेच्या दुस-या सायकलमधील पहिल्या वर्षामध्ये (सन २०१७-१८) जमिन आरोग्य पत्रिकांचे वितरण झालेले असावे.

क) गावाची निवड करताना ते **मध्यवर्ती** ठिकाण असेल असे पहावे जेणेकरून तालुक्यातील इतर गावातील शेतक-यांसाठी त्या ठिकाणी जमिन आरोग्य पत्रिका विषयक प्रात्यक्षिकांना प्रक्षेत्र भेटी देता येणे शक्य होईल तसेच प्रशिक्षण, मेळावे इ. बाबी राबविण्यात येतील व सदर गाव योजनेसाठी ‘आदर्श गाव’ म्हणुन विकसित होऊ शकेल.

ड) रासायनिक खतांचा जास्तीचा वापर, सेंद्रिय कर्बाचे कमी प्रमाण, सुक्ष्म मुलद्रव्यांच्या वापराचा अभाव इ. असलेले गाव.

उपरोक्तनुसार गावाची निवड संबंधित तालुका कृषि अधिकारी हे **दिनांक १० मे, २०१९** पर्यंत करतील. निवड केलेल्या गावाचे नाव व त्यातील महसूल नोंदीनुसार त्यातील शेतकरी खातेदार संख्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना **दिनांक ११ मे, २०१९** पर्यंत कळवतील. अशा रीतीने संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी हे जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील निवडलेल्या गावांची नावे, एकूण खातेदार संख्या, गावातील एकूण वहितीखालील क्षेत्र, काढण्यात येणारे मृद नमुन्यांची संख्या इ.माहिती जिल्हास्तरीय कार्यकारी समितीच्या मान्यतेने **आयुक्तालयास दि. १५ मे, २०१९ पर्यंत सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये सादर करतील**. जेणेकरून दि. २० मे, २०१९ अखेर राज्याच्या एकुण कार्यक्रमाचा बाबनिहाय कृती आराखडा केंद्र शासनास सादर करणे शक्य होईल.

**ब) मृद नमूने काढण्यासाठी खालील घटक सहभागी होऊ शकतात.:**

योजनेतील मृद नमुने काढण्याची जबाबदारी कृषि विभागाच्या क्षेत्रीय स्तरावरील कर्मचा-यांची राहील, तथापी तालुका कृषि अधिकारी हे मृद नमुने काढताना खालील घटकांचे सहाय्य घेऊ शकतात.

अ) कृषि विभागातील क्षेत्रिय कर्मचारी
ब) विज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी व त्यांच्या मृद चाचणी प्रयोगशाळेतील कर्मचारी वर्ग
क) कृषि विद्यापिठ आणि मृद चाचणी कर्मचारी वर्ग
ड) प्रशिक्षीत / तज्ञ शेतकरी, आत्माअंतर्गत नियुक्त कृषिमित्र, नोंदणीकृत मृद तपासणी प्रयोगशाळांचे कर्मचारी.

**क) मृद नमूने काढणे व सॅम्पल स्लिप भरणे :**

**१) प्रत्येक तालुक्यातून निवड केलेल्या एका गावातील महसूली माहितीनुसार सर्व शेतकरी खातेदारांच्या शेत जमीनीतील मृद नमुना संबंधित कृषि सहाय्यकाने काढणे आवश्यक आहे. यामध्ये जर संबधित खातेदार शेतक-याची एकापेक्षा जास्त ठिकाणी लागवडीखाली शेतजमीन असल्यास अशा सर्व क्षेत्रातून प्रत्येकी एक मातीचा नमुना काढावयाचा आहे व त्याप्रमाणे प्रत्येक क्षेत्रासाठी वेगळया नमुना चिठ्ठीमध्ये माहिती भरून सदरचे मृद नमूने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवावयाचे आहेत. अशा प्रकारच्या खातेदारानां त्यांच्या क्षेत्रानुसार काढण्यात आलेल्या मृद नमुन्यांच्या संख्येप्रमाणे जमीन आरोग्यपत्रिका देण्यात याव्यात. त्यामुळे खातेदार शेतकरी जरी एक असला तरी त्याच्या एकापेक्षा जास्त ठिकाणी असणा-या शेतजमीनीनुसार जमीन आरोग्य पत्रिकांची संख्या वाढणार आहे. नमुना चिठ्ठीचा विहीत नमुना सोबत सहपत्रित केला आहे.**

२) शास्त्रशुध्द पध्दतीने मृद नमूने काढण्यावरच मृद परिक्षणाची गुणवत्ता व खतमात्रांची शिफारस अवलंबून असते. त्याकरिता कृषि विदयापीठाने विहित केलेल्या पद्धतीनुसार मृद नमूने काढण्यात यावेत.

३) मृद नमूने काढलेल्या शेतक-यांची यादी गावांतील ग्रामपंचायतीमध्ये लावण्यात यावी. मंडल कृषि अधिकारी, सरपंच व ग्रामसेवक यांचेकडून योग्य पध्दतीने मृद नमूने काढल्या बाबतचे एकत्रित प्रमाणपत्र घेण्यात यावे.

४) जी.पी.एस.उपकरण/जीपीएस सुविधा असलेले मोबाईलचा उपयोग करुन मृद नमुने काढण्यात यावेत व त्याची (अक्षांश/रेखांश) माहीती सॅम्पल स्लीप मध्ये अचुक भरणे बंधनकारक आहे.

५) स्ट्रॅटीफाईड सॅम्पलींग पध्दतीचा अवलंब करुन नमुने काढण्यात यावेत.

६) मृद नमुने विहित पध्दतीनुसार व तांत्रिक दृष्टया योग्य आहेत किंवा नाही आणि नमुन्यांचे ठिकाण अक्षांश व रेखांश व्दारें निश्चत केले आहे किंवा नाही याची शहानिशा करण्याची जबाबदारी मंडळ कृषि अधिकारी यांची राहिल. गावाची निवड अंतिम झाल्यावर दि.११ ते २० मे, २०१९ या कालावधीत युध्द पातळीवर शास्त्रशुध्द पध्दतीने गावातील सर्व खातेदारांच्या क्षेत्रातील माती नमुने विशेष मोहिम राबवून काढावेत. तसेच माती नमुने काढतांना त्याच वेळेस विहित केलेल्या प्रपत्रामध्ये (सॅम्पल स्लिप) नमुन्याचा तपशील, शेतक-याची वैयक्तिक माहिती (आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, प्रवर्ग,इ.) जमिनीची माहिती (क्षेत्र, सर्व्हे नंबर, अक्षांश/रेखांश)

सर्वसाधारण पिकांचा तपशील इ. माहिती पूर्णपणे भरणे बंधनकारक करण्यात आले आहे. **अपूर्ण सॅम्पल स्लिपचे नमूने प्रयोगशाळेत स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

**ड ) मृद नमून्यांचे विश्लेषणासाठी सहभागी होणा-या प्रयोगशाळा :**

केंद्र शासनाच्या सुचनानुसार निवड केलेल्या गावातील सर्व खातेदारांना त्यांच्या माती नमुन्यांची तपासणी करुन जमिन आरोग्य पत्रिका खरीप हंगामाच्या सुरुवातीस वितरण करावयाच्या आहेत. त्यामुळे दिनांक २० मे ते ५ जून,२०१९ या कालावधीत जमिन आरोग्य पत्रिका सर्वाथाने युध्दपातळीवर उपलब्ध नोंदणीकृत प्रयोगशाळांच्या मार्फत तयार करणे आवश्यक आहे. यासाठी खालील प्राधान्यक्रमानुसार व उपलब्ध असलेला अल्प कालावधी लक्षात घेऊन गोळा होणा-या मृद नमुन्यांच्या तपासणीचे उद्दिष्ट संबंधित प्रयोगशाळांना त्यांचे क्षमता विचारात घेऊन देणे गरजेचे आहे.

**मृद नमुने तपासणीसाठी नोंदणीकृत प्रयोगशाळांचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे राहील :-**

१) शासकिय मृद चाचणी प्रयोगशाळा

२) कृषि विद्यापीठ/कृषि महाविद्यालये/कृषि विज्ञान केंद्र

३) कृषि प्रशिक्षण संस्था

४) शेतकरी सभासद असलेली महामंडळे

५) सहकारी साखर कारखाने

६) मृद निगडीत एनएबीएल संलग्न (मान्यताप्राप्त) खाजगी अशासकीय मृद परिक्षण प्रयोगशाळा (स्थायी/फिरत्या)

७) खाजगी अशासकीय मृद परिक्षण प्रयोगशाळा (स्थायी/फिरत्या)

**इ) मृद नमुन्यांचे विश्लेषण :**

काढण्यात आलेल्या प्रत्येक मृद नमुन्यांची केंद्र शासनांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खालील १२ घटकांसाठी कृषि विद्यापीठाने विहीत केलेल्या पध्दतीनुसार तपासणी करणे.

अ) जमिनीचा सामू (pH) , क्षारता (EC) , सेंद्रिय कर्ब (OC)

ब) **प्रमुख अन्नद्रव्ये**- उपलब्ध नत्र(N), उपलब्ध स्फुरद(P) , उपलब्ध पालाश(K) व गंधक(S)

क) **सूक्ष्म अन्नद्रव्ये** - उपलब्ध जस्त(Zn), तांबे(Cu), लोह(Fe) , मंगल(Mn) व बोरॉन(B)

ड) मृद नमुने प्रयोगशाळेस प्राप्त होताच मृद नमुन्यांची नोंदणी ( Sample Registration) केंद्र शासनाच्या (MIS Software) ऑनलाईन संगणक प्रणालीवर करावी तसेच मृद विश्लेषणाचे काम पूर्ण होताच ते केंद्र शासनाच्या (MIS Software) ऑनलाईन संगणक प्रणालीवर निष्कर्ष भरुन रंगीत जमिन आरोग्य पत्रिका विहित नमुन्यातच प्रिंट (१०० जीएसएम पेपरवर) करुन क्षेत्रिय पातळीवरील यंत्रणेमार्फत शेतक-यांना त्वरीत मार्गदर्शनासह वितरण करण्यात यावे.

इ) जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा ही त्या जिल्हयात नोडल प्रयोगशाळा म्हणून काम करेल. या प्रयोगशाळेने जिल्हयाचा मृद नमुन्यांची तपासनी व मृद आरोग्यपत्रिका वितरण करणेबाबतचा सविस्तर कृति आराखडा तयार करावा. शासकीय मृद चाचणी प्रयोगशाळांनी आवश्यकतेनुसार कंत्राटी स्वरुपाचा कर्मचारी वर्ग विभागीय कृषि सहसंचालक यांचे मार्फत उपलब्ध करुन घ्यावा.

फ) मृद विश्लेषणाची गुणवत्ता राखण्यासाठी जिल्हयातील निघणा-या एकूण मृद नमून्यांचे रॅण्डम पध्दतीने १ % मृद नमुन्यांचे नोडल प्रयोगशाळेत विश्लेषण करण्यात यावे. म्हणजे मृद विश्लेषणाच्या गुणवत्तेवर नियंत्रण राहील.

भ) या योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान जिल्हयातील सर्व संबंधित अधिका-यांनी नियमितपणे मृद चाचणी प्रयोगशाळांची तांत्रिक तपासणी करावी. (तांत्रिक तपासणी सुधारीत मार्गदर्शक सुचना दि.२४.०७.२०१८ )

## ई) <u>मृद नमुने तपासणीचे नियोजन :</u>

मृद चाचणी प्रयोगशाळांना मृद नमुने विश्लेषणासाठी वितरीत करताना योजनेअंतर्गत जिल्हयामध्ये एकूण काढलेले मृद नमुने व जिल्हयात उपलब्ध असलेल्या नोंदणीकृत प्रयोगशाळेची मृद नमूने तपासणीची वार्षिक क्षमता व उपलब्ध कालावधी लक्षात घेऊन वितरीत करण्यात यावेत.

जिल्हयातील योजनेत सहभागी मृद चाचणी प्रयोगशाळांना त्यांच्या क्षमतेनुसार मृद नमुने वितरीत केल्यानंतरही जर मृद नमुने शिल्लक राहत असतील तर सदरचे मृद नमुने विभागातील इतर प्रयोगशाळांना वितरीत करण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक यांना त्वरीत कळवावे. विभागीय कृषि सहसंचालक यांनी आपल्या विभागातील योजनेत सहभागी नोंदणीकृत प्रयोगशाळांना सदरचे नमुने विश्लेषणासाठी त्वरीत वाटप करुन त्यांना तपासणीसाठी वेळेचे (५जुन,२०१९ पर्यत) बंधन घालुन दयावे. प्रयोगशाळांच्या कमतरतेमुळे जर विभागातील प्रयोगशाळांची मृद नमुने तपासणीच्या क्षमतेपेक्षा मृद नमुन्यांची संख्या जास्त होत असेल तर सदरचे मृद नमुने राज्यस्तरावर नोंदणीकृत असणा-या प्रयोगशाळेकडुन तपासुण घेण्यासाठी विभागीय कृषि सहसंचालक यांनी सविस्तर प्रस्ताव आयुक्तालयास सत्वर सादर करावा. जेणेकरुन आयुक्तालय स्तरावरुन विभागातील अशा जास्तीच्या मृद नमुन्याच्या तपासणीसाठी राज्यस्तरीय नोंदणीकृत मृद चाचणी प्रयोगशाळांना प्राधीकृत करेल त्यामुळे वेळेवर मृद नमुन्याची तपासणी होवुन शेतक-यांना जमिन आरोग्य पत्रिकांचे वितरण करणे सुलभ होईल. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार सन २०१९-२० मध्ये जिल्हयातील एकूण मृद नमुन्याची संख्या अल्प होणार असल्याने या प्रक्रियेची शक्यतो गरज भासणार नाही.

## फ) मृद आरोग्य पत्रिका वितरण –

संबंधित तालुकयास त्यांनी निवडलेल्या गावाच्या जमिन आरोग्य पत्रिका संबंधित प्रयोगशाळांकडून प्राप्त झाल्यावर त्या ७ जुन, २०१९ पर्यंत सर्व शेतक-यांना संबंधित तालुक्यांच्या क्षेत्रिय यंत्रणेमार्फत मार्गदर्शन करुन वितरीत कराव्यात. यासाठी कृषि विद्यापीठ, कृषि संशोधन केंद्र, कृषि विज्ञान केंद्र यांचेकडील शास्त्रज्ञांच्या सहयोग घेण्यात यावा. मृद आरोग्य पत्रिकेचे महत्व पटवुन त्याच्या वापरा विषयी घडीपत्रीका, लिफलेट, माहितीपत्रिका याव्दारे माहिती देण्यात येईल याची खबरदारी घ्यावी. तसेच मृद आरोग्य पत्रिका वितरण केल्यानंतर कृषि सहाय्यकाने त्याची नोंद नोंदवहीत दिनांकनिहाय शेतक-याच्या स्वाक्षरीसह घेण्यात यावी. सदरची नोंदवही महत्वाचा लेखाभिलेख म्हणुन तालुका स्तरावर जतन करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत मृद आरोग्य पत्रिका वितरणाविना प्रयोगशाळेत, कार्यालय, ग्रामपंचायत स्तरावर पडून राहणार नाहीत याची दक्षता संबंधित क्षेत्रीय कर्मचा-यांनी घ्यावयाची आहे. असे आढळुन आल्यास संबधितांवर योग्य ती प्रशासकीय कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.

## ७) <u>आर्थिक कार्यक्रम</u> :

सन २०१९-२० करीत केंद्र शासनाने योजनेअंतर्गत मृद आरोग्य पत्रिका वितरण, सुक्ष्म मुलद्रव्ये व भुसुधारक वापराच्या प्रात्यक्षिकांना अर्थसहाय्य तसेच अभियान व्यवस्थापन या बाबी अंतर्भूत केलेल्या आहेत. त्याबाबतचे आर्थिक मापदंड खालीलप्रमाणे आहेत.

**अ) घटक क्रमांक. १ :-**

**मृद विश्लेषण आणि जमिन आरोग्य पत्रिका वितरणा करिता आर्थिक निकष (रु.३००/- प्रती मृद नमूना)**

| अ.क्र. | तपशिल | आर्थिक तरतूद (रुपये) |
|---|---|---|
| १ | नमुना पिशवी, नमूना चिठ्ठी, मृद नमूना काढणे, वाहतूक व जमिन आरोग्य पत्रिका वितरण | ४०.०० |
| २ | मृद नमूना विश्लेषण, विश्लेषणचे निष्कर्ष संगणक प्रणालीवर अपलोड करणे रंगीत जमिन आरोग्य पत्रिका तयार करणे, प्रयोगशाळा व्यवस्थापन व अनुषंगीक सर्व बाबी इ. | २६०.०० |
| | **एकूण :-** | **३००.००** |

वरील आर्थिक निकषाच्या मर्यादेत राहून निरनिराळया घटकांवर निधी खर्च करणे याबाबीकरिता लवचिकता प्रदान केली असून स्थानिक परिस्थितीनुसार जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना निर्णय घेण्याचे अधिकार राहतील. तथापी कोणत्याही परिस्थितीत प्रती मृद नमूना रु. ३००/- च्या मर्यादेतच खर्च होईल याची दक्षता घ्यावी.

- **<u>नोंदणीकृत अशासकिय प्रयोगशाळांना निधी वितरण कार्यप्रणाली</u>**

१) मृद नमुन्यातील सर्व (१२ घटक) घटकांची विहित पध्दतीने तपासणी करणे बंधनकारक राहिल.
२) जमिन आरोग्य पत्रिका केंद्र शासनाचे ऑनलाईन सॉफ्टवेअर संगणक प्रणालीमध्ये तयार करणे बंधनकारक राहील.
३) शेतक-यांना वितरीत करण्यात येणा-या मृद आरोग्य पत्रिका अे ४ रंगीत प्रिंट १०० जी एस एम कागदावर व प्रयोगशाळेच्या सही शिक्यासह असावी.
४) मृद आरोग्य पत्रिकाबाबतचे देयक सादर करतांना <u>प्रयोगशाळेच्या लेटर हेडवर</u> सादर करण्यात यावे.
५) सदर देयक तालुका कृषि अधिकारी यांनी प्रमाणित करुन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात सादर केल्यानंतरच देयके अदा करण्यात यावीत.
६) जमिन आरोग्य पत्रिका संबंधित ताकृअ यांचेकडे पोहोच केल्यानंतर खालील प्रपत्रात देयक सादर करावेत.

## मृद आरोग्य पत्रिका योजना

### मृद नमुने विश्लेषणाचे देयक

**दिनांक / /२०१**

- नोंदणीकृत अशासकिय प्रयोगशाळेचे नाव- ---------------------
- नोंदणी क्रमांक :-
- नोंदणी कालावधी :- . मृद नमुने प्राप्त दिनांक :-

| अ.क्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | तपासलेल्या मृद नमुने संख्या | प्रति नमुने तपासणी दर @ रु २६०.०० | एकुण देय रक्कम | जमिन आरोग्य पत्रिकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| एकुण | | | | | | |

**दिनांक :-** **प्रयोगशाळा प्रमुखांची स्वाक्षरी /शिक्का**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त मृद चाचणी प्रयोगशाळेकडून ------------ गावातील ---------- मृद नमुने तपासले असून त्यांच्या एकुण ---------- जमिन आरोग्य पत्रिका रंगीत व १०० जी एस एम च्या पेपरवर सुस्थितीत प्राप्त झाल्या असून, सदर प्रयोगशाळेस मापदंडानुसार देयक अदा करण्यास हरकत नाही.

**दिनांक :-** **तालुका कृषि अधिकारी**

----------------

**(स्वाक्षरी /शिक्का)**

## ब) घटक क्रमांक २ : सुक्ष्म मुलद्रव्ये व भुसुधारक वापराच्या प्रात्यक्षिकांना अर्थसहाय्य :

| अ.क्र. | तपशिल | आर्थिक मापदंड (रुपये) |
|---|---|---|
| १ | जिप्सम /फॉस्फो जिप्सम /बेंटोनेट सल्फर | प्रति प्रात्यक्षिक प्लॉटला रु.२५००/- हे. मर्यादेपर्यंत |
| २ | सुक्ष्म मुलद्रव्ये | |
| ३ | सर्व बायोफर्टीलायझर (जैविक खते) | |
| ४ | चुना /लायमिंग मटेरीयल | |
| **एकुण** | | |

**क) घटक क्रमांक ३ : अभियान व्यवस्थापन : राज्य स्तरावरील बाब**

**८) <u>अनुदान वितरण पध्दती</u> :-**

राज्य शासनाच्या सुचनांनुसार या योजनेचा निधी वितरणाची कार्यवाही केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीव्दारा व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्या कडील योजनेकरीता स्वतंत्र बँक खात्याव्दारे केली जात आहे. त्यामुळे योजनेचा निधी यापूर्वी दिलेल्या सुचनांव्दारा संबंधितांना निधी वितरण करावे यासाठी बाबनिहाय व देयकनिहाय खर्चास योजनेच्या मापदंडानुसार व प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचना व निधीप्रमाणे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची पुर्वमान्यता घ्यावी. कोणत्याही परिस्थितीत PFMS प्रणाली व्यतिरिक्त योजनेचा खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

- **उपयोगिता प्रमाणपत्र –**

योजनेच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र व राज्यशासनास स्वतंत्ररित्या विहीत प्रपत्रात (GFR 12-C) जिअकृअ यांचे स्वाक्षरीने वेळेत सादर होईल याविषयी खबरदारी घ्यावी.

**९) <u>पिक प्रात्यक्षिकाचे आयोजन करणे :–</u>**

खरीप/ रब्बी हंगामामध्ये कृषि विभागामार्फत राबविण्यात येणा-या विविध योजने अंतर्गत पिक प्रात्यक्षिकाचे आयोजन केले जाते. यामध्ये यापुढे पिक प्रात्यक्षिकाचे आयोजन करताना द्वितीय सायकल अंतर्गत संबंधित शेतक-यांच्या जमिन आरोग्य पत्रिकेनुसार पिकांना शिफारशी केलेल्या खतमात्रांचा अवलंब करावा. व त्याप्रमाणातच निविष्ठांचा पुरवठा संबंधित पिक प्रात्यक्षिक क्षेत्राकरिता करावा. पिक प्रात्यक्षिकांबाबतच्या सर्व नोंदी अद्ययावत ठेवाव्यात व परिसरातील शेतक-यांना सदर प्रात्यक्षिक क्षेत्रावर शेतीदिना दिवशी आमंत्रित करुन पिकामधील झालेला बदल उत्पादन वाढ, प्रत सुधारणा इ.बाबी निदर्शनास आणाव्यात जेणेकरुन इतर शेतक-याना मृद आरोग्य पत्रिकेनुसार खताची मात्रा वापरण्यास प्रोत्साहन मिळेल येत्या खरीप हंगामापासुन मृद आरोग्य पत्रिकेनुसारच पिक प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्याची जबाबदारी जिअकृअ यांची राहील. तसेच सन २०१९-२० मध्ये योजनेअंतर्गत निवडलेल्या गावामध्ये सुध्दा इतर योजनांतील प्रात्यक्षिकांचे आयोजन करुन वितरीत करण्यात येणा-या जमिन आरोग्य पत्रिकेतील शिफारशीनुसार खतांच्या शिफारशी अंवलबिण्यात याव्यात.

**१०) <u>योजनेचे सनियंत्रण :-</u>**

योजनेची अंमलबजावणी निवड केलेल्या गाव स्तरावर कृषि सहाय्यक यांनी, तालुका कृषि अधिकारी यांचे तांत्रिक मार्गदर्शनानुसार करावी व सनियंत्रण मंडळ कृषि अधिकारी यांनी करावे. या योजनेचे तालुकास्तरीय सनियंत्रण तालुका कृषि अधिकारी यांनी जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी यांचे समन्वयाने करावे. तसेच या योजनेचे जिल्हा स्तरावरील सनियंत्रण जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि उपसंचालक(समन्वय अधिकारी) यांनी जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी यांचे मदतीने करावे. योजनेंतर्गत जिल्हयामध्ये <u>निवडलेल्या गावांना</u> मंडळ कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, उपविभागीय कृषि अधिकारी आणि जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी क्षेत्रीय दौ-यांमध्ये

वेळोवेळी भेटी देऊन कामाचा आढावा घेवुन मृद आरोग्य पत्रिका शेतक-यांना मिळाल्याची खात्री करावी. तसेच जिल्हा, उपविभाग व तालुकास्तरावर आयोजित होणा-या सात्पाहिक मासिक आढावा सभेत सदर महत्वकांक्षी योजनेच्या कामाचा प्रगती आढावा अग्रक्रमाने घेण्यात यावा. जिल्हयामध्ये सदर कार्यक्रम राबविण्याची प्रमुख जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची राहील.

विभागीय कृषि सहसंचालक यांनी या कार्यक्रमाचा वेळोवेळी आढावा घेऊन विभागामध्ये जिल्हानिहाय व तालुकानिहाय गावाची निवड, सर्व खातेदारांचे मृद नमूने काढणे, मृद नमुन्यांचे प्रस्तावित प्रयोगशाळांना विश्लेषणासाठी वितरण करणे, नमून्यांचे विहित कालावधीत विश्लेषण करुन त्याची माहिती एमआयएस पोर्टलवर अपलोड होणे, पत्रिकांची छपाई होणे, जआप तालुकास्तरावर पोहोच होणे, जआप चे शेतक-यांना वितरण होणे, शिफारशीनुसार सुक्ष्म मूलद्रव्ये व भूसुधारक यांचा पुरवठा होऊन प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे इ. बाबींच्या वेळेवरील प्रगतीकडे लक्ष पुरवावे.

केंद्र शासनाचा सदर महत्वकांक्षी कार्यक्रम आपल्या कार्यक्षेत्रांत यशस्वीपणे राबविला जाईल यानुसार कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरीत/-

**कृषि संचालक**

**(निविष्ठा व गुणनियंत्रण)**

**कृषि आयुक्तालय,म.रा. पुणे-१**

## परिशिष्ट – १

### जमिन आरोग्य पत्रिका योजना सन २०१८-१९ जिल्हानिहाय मृद नमुने काढण्याचे लक्षांक

| अ.क्र | जिल्हा | तालुक्यांची एकूण संख्या | निवड गावांची एकूण संख्या | निवड गावातील शेतकरी खातेदारांची एकूण संख्या | निवड गावातील वहितीखालील एकूण क्षेत्र (हे.) | मृद नमुन्यांची एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ठाणे | | | | | |
| २ | पालघर | | | | | |
| ३ | रायगड | | | | | |
| ४ | रत्नागिरी | | | | | |
| ५ | सिंधुदूर्ग | | | | | |
| **एकुण विभाग** | | | | | | |
| ६ | नाशिक | | | | | |
| ७ | धुळे | | | | | |
| ८ | नंदुरबार | | | | | |
| ९ | जळगांव | | | | | |
| **एकुण विभाग** | | | | | | |
| १० | अहमदनगर | | | | | |
| ११ | पुणे | | | | | |
| १२ | सोलापूर | | | | | |
| **एकुण विभाग** | | | | | | |
| १३ | सातारा | | | | | |
| १४ | सांगली | | | | | |
| १५ | कोल्हापूर | | | | | |
| **एकुण विभाग** | | | | | | |
| १६ | औरंगाबाद | | | | | |
| १७ | जालना | | | | | |
| १८ | बीड | | | | | |
| **एकुण विभाग** | | | | | | |
| १९ | लातूर | | | | | |
| २० | उस्मानाबाद | | | | | |
| २१ | नांदेड | | | | | |
| २२ | परभणी | | | | | |
| २३ | हिंगोली | | | | | |
| **एकुण विभाग** | | | | | | |
| २४ | बुलडाणा | | | | | |
| २५ | अकोला | | | | | |
| २६ | वाशीम | | | | | |
| २७ | अमरावती | | | | | |
| २८ | यवतमाळ | | | | | |
| **एकूण विभाग** | | | | | | |
| २९ | वर्धा | | | | | |
| ३० | नागपूर | | | | | |
| ३१ | भंडारा | | | | | |
| ३२ | गोंदीया | | | | | |
| ३३ | चंद्रपूर | | | | | |
| ३४ | गडचिरोली | | | | | |
| **एकूण विभाग** | | | | | | |
| **एकूण राज्य** | | | | | | |

## प्रपत्र - अ

राष्ट्रीय शाश्वत शेती अभियानांतर्गत जमिन आरोग्य पत्रिका योजना सन २०१९-२० आठवडी प्रगती अहवाल (दि.  /  /   अखेर)

| अ. क्र | जिल्हा | सन २०१९-२० साठी मृद नमुने काढण्याचे एकूण लक्षांक | काढण्यात आलेले मृद नमुने संख्या | % | प्रत्यक्ष प्र.शाळेस प्राप्त मृद नमुने संख्या | तपासण्यात आलेले मृद नमुने संख्या | % | आरोग्य पत्रिका वितरण लक्ष | तयार आरोग्य पत्रीकांची संख्या | त्यापैकी वाटप आरोग्य पत्रीकांची संख्या | % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | | | | | | | | | | | |

**सही/ शिक्का**

**जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी**

## प्रपत्र - ब

जमिन आरोग्य पत्रिका कार्यक्रम २०१९-२० प्रयोगशाळानिहाय मृद नमुने वितरण/तपासणी/ जआप छपाई अहवाल

(दि -------- अखेर)

जिल्हा -

| अ.क्र | प्रयोगशाळेचे नाव | प्रयोगशाळाप्रकार (स्थायी/फिरती/ मिनीलॅब) | मृद नमुने तपासणी वार्षिक क्षमता | जिल्हयाने प्रयोगशाळानिहाय दिलेला लक्षांक (संख्या) | पैकी वितरीत केलेले मृद नमुने (संख्या) | पैकी तपासणी केलेले मृद नमुने (संख्या) | MIS प्रणालीवर नोंदणी केलेले मृद नमुने संख्या | छपाई पुर्ण केलेले जआप (संख्या) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |

**सही/ शिक्का**

**जिल्हा मृद सर्वेक्षण मृद चाचणी अधिकारी**